स्थानिक संस्था, सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम,
सांविधिक संस्था, महामंडळे, इत्यादी मधील
मागासवर्गीय उमेदवारांसाठी राखून ठेवलेली पदे
व इतर सवलती देण्याबाबत योग्य अंमलबजावणी.

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
परिपत्रक क्रमांक-बीसीसी-१०८७/१६-ब,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १२ फेब्रुवारी १९८७.

वाचा :- [१] शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-ईईओ-१०७०/सी, दिनांक २५ ऑगस्ट १९७०.

[२] शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-बीसीसी-१०७२/ इसीआर-जे, दिनांक १५ जून १९७२.

[३] शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक:बीसीसी-१०७२/ इसीआर-जे, दिनांक १७ एप्रिल १९७३.

[४] शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक:बीसीसी-१०७५/ ५७९/इसीआर-१६, दिनांक १६ जानेवारी १९७६.

[५] शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग,क्रमांक-बीसीसी-१०७७/ ४९८/१६, दिनांक १२ ऑक्टोबर १९७७.

[६] शासन परिपत्रक,सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-बीसीसी-१०८२/ १६-ब, दिनांक १ जून १९८२.

परिपत्रक :- शासनाने मागासवर्गीयांसाठी शासकीय सेवेत सरळसेवा भरती व पदोन्नतीसाठी आरक्षण विहित केले असून त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी व्हावी असे वेळोवेळी आदेश काढले आहेत. तथापि, शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, या आदेशांची तंतोतंत अंमलबजावणी होत नाही.

२. शासनाने मागासवर्गीयांसाठी आरक्षित ठेवलेल्या पदांसंबंधीचे धोरण व आदेश यांची व्याप्ती विविध स्थानिक संस्था, सार्वजनिक क्षेत्रातील शासकीय उपक्रम, सांविधिक संस्था, महामंडळे इत्यादी पर्यंत वाढविली आहे. या मंडळांनी सदर आदेशांची योग्य ती अंमलबजावणी करावी यादृष्टीने शासन परिपत्रक, क्रमांक-बीसीसी-१०८२/१६-ब, दिनांक १ जून, १९८२ अन्वये असे निदेशही दिलेले होते. विभागाचे आयुक्त आणि जिल्हाधिकारी यांनी शासनाचा प्रतिनिधी म्हणून वस्तुस्थिती अजमावून पहाण्यासाठी आणि अशा मंडळांच्या कार्यान्वयन प्राधिकाऱ्यांना आवश्यक ते मार्गदर्शन करण्यासाठी व सल्ला देण्यासाठी आपल्या संबंधित अधिकारितेतील कार्यालयांना भेटी द्याव्यात अशा सूचनाही देण्यात आल्या होत्या. तसेच सर्व मंत्रालयीन विभागांनाही अशी विनंती करण्यात आली होती की, त्यांनी त्यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील कार्यालये, स्थानिक मंडळे, सांविधिक मंडळे, महामंडळे इत्यादींना वर उल्लेखिलेल्याप्रमाणे

कृ. मा. प.

भेट देणा-या प्राधिका-यांना आवश्यक ती सर्व माहिती उपलब्ध करून देण्यासंबंधी आणि त्यांचे मार्गदर्शन व सल्ला पुरेपूर उपलब्ध करून घेण्यासंबंधी योग्य ते निदेश द्यावेत.

३. वरील आदेशांचा या परिपत्रकाद्वारे पुनरोच्चार करण्यात येत असून मागासवर्गीयांच्या आरक्षणविषयक व अन्य सवलती बाबत शासनाने जे आदेश काढले आहेत, त्यांची तंतोतंत अंमलबजावणी होण्याचे दृष्टीने सर्व मंत्रालयीन विभागांना पुन: एकदा विनंती करण्यात येते की, त्यांनी आपापल्या अधिपत्याखालील सर्व कार्यालये, निमशासकीय संस्था, वा मंडळे, महापालिका इत्यादी मध्ये शासनाचे याबाबतचे आदेश पाळले जातात याची योग्य ती दक्षता घ्यावी व जरूर भासेल तेथे संबंधित कार्यालयांची तपासणी करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

सु. रामकृष्ण,
विशेष सचिव[सेवा].

प्रति,

राज्यपालांचे सचिव,
मुख्यमंत्र्यांचे सचिव,
सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
सर्व विभागीय आयुक्त,
संचालक, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे,
सर्व जिल्हाधिकारी,
मंत्रालयीन विभागांच्या अधिपत्याखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग,
आदिवासी विकास विभाग,
इतर सर्व मंत्रालयीन विभाग.

---

एच-९१२[३०००-३-८७]-अ.